कि.फौ.ख.क्र.४७/२०२५ बबनराव वि. प्रदिप+ १ नि.क्र. १

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २२३ प्रमाणे फिर्यादीचे सत्यापन–**

**फिर्यादी साक्षीदार क्र.१**

**माझे नाव बबनराव दादाराव देशमुख**
**वय– ७४ वर्ष, व्यवसाय– सेवानिवृत्त,**
**रा.संतोष नगर, मुर्तिजापूर ता. मुर्तिजापूर, जि. अकोला**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, आरोपी प्रदिपराव देशमुख हे माझ्या मुलाचे सासरे आहेत. आरोपी क्र. २ श्रुतुजा ही माझ्या मुलाची पत्नी. माझा मुलगा नामे शुभम देशमुख याचा विवाह दि.११.०७.२०२४ रोजी आरोपी क्र.२ सोबत झाला. लग्नानंतर आरोपी क्र.२ आमच्याकडे राहण्यास आली. दि.१२.०७.२०२४ रोजी माहेरचे लोक आरोपी क्र.२ ला तिच्या माहेरी घेवून गेले. त्यानंतर आम्ही दि.१७.०७.२०२४ रोजी उमरा येथे आरोपी क्र.२ ला घरी आणण्यासाठी गेलो. त्यानंतर माझा मुलगा दोन ते तीन दिवस माझ्याकडे थांबला व नंतर संसार उपयोगी वस्तु घेवून बारडोली येथे नोकरी करीता गेला. त्यावेळी आरोपी क्र.२ आमच्या कडे २० ते २२ दिवस थांबली. त्यानंतर माझ्या मुलाने मला आरोपी क्र.२ ला बारडोली ला घेवून या असे म्हणाला म्हणून मी, माझी पती व आरोपी क्र.२ असे मिळून दि.१२.०८.२०२४ बारडोली येथे गेलो. त्यानंतर मी व माझी पत्नी परत मुर्तिजापूर येथे आले. त्यानंतर दि.३१.०८.२०२४ रोजी मी व माझी पत्नी पशुपतीनाथ तिर्थ यात्रेवर जावून गावी परत आलो. त्यानंतर दि.०१.०९.२०२४ माझा व आरोपी क्र.२ मुर्तिजापूर येथे आली. त्यानंतर माझ्या मुलाने घडलेला प्रकार सांगितला. आरोपी क्र.२ ही नेहमीच कशाच्या तरी गोळ्या खात होती. तिला गोळ्या कशाच्या खात असे विचारले असता तिने मानसिक विकाराबाबतची गोळी खात असल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपी क्र.२ ला कशामुळे तनाव येतो असे विचारले. तेव्हा तिने सांगितले की, सन २०१९ व २०२१ या दोन वर्षाच्या कालावधी दरम्यान मी आत्महत्या करण्याच्या प्रयत्न केला होता त्यामुळे मला डॉ.सुजय पाटील व डॉ. केळकर या मानसोपचार उपचार सुरू आहे. आम्ही सदर घटना आरोपी क्र.१ ला सांगितली असता

त्यांनी आम्हाला माहिती देण्यास टाळाटाळ केली. माझ्या मुलाने सदरहू बाब आरोपी क्र.१ ला विचारले असता त्याने आरोपी क्र.२ च्या आजारपणाचे कागदपत्रे पाठविले. अशा प्रकारे आरोपी क्र.१ व २ यांनी आमच्या कुटुंबाची फसवणुक केली. त्यानंतर आरोपी क्र.१ ने आरोपी क्र.२ ला दि.०६.०९.२०२४ रोजी त्याच्या गावी नेले. त्यानंतर सदरहू प्रकरणाबाबत माझ्या मुलाने मुर्तिजापूर शहर पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार दिली परंतु पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही म्हणून पोलीस अधिक्षक अकोला यांच्याकडे तक्रार केली. परंतु शहर पोलीसांनी कुठलीही कारवाई केली नाही म्हणून मी न्यायालयात प्रस्तुत तक्रार दाखल केली. या व्यतिरिक्त मला काहीही सांगायचे नाही. त्यांच्याविरुध्द कार्यवाई व्हावी.

----------
साक्षीदाराची सही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

( ए.जी. तांबोळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१) मुर्तिजापूर
दि.२२/०९/२०२५

**माझ्या समक्ष,**

( ए.जी. तांबोळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१) मुर्तिजापूर